Reg. No. MCS/069/2018-20 R. N. I. Reg. No. 1591/57

मुंबई, गुरुवार, १५ ऑक्टोबर २०२६ WWW.LOKSATTA.COM

# लोकसत्ता

मुंबई, पुणे, नागपूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकमान्य, लोकशक्ती!




तापमान

कमाल ३८°से | किमान २६°से

हवामानाचा अंदाज
आकाश निरभ्र राहील.

NECC Vencobb
ब्रॉयलर विकण्याचा दर (पोल्ट्रीफार्मवर) १११ रु. प्रति किलो
किरकोळ विक्रीचा दर जिवंत कोंबडी १३९ रु. प्रति किलो
ड्रेस्ड कोंबडी (स्किनसह) दर १७२ रु. प्रति किलो
अंडी किरकोळ विक्री दर ७८ रु. प्रति १२ अंडी

## काय चाललंय काय!

प्रशांत कुलकर्णी



मी फक्त इतकंच म्हटलं होतं की, 'माझी लोकशाहीवर श्रद्धा आहे! त्यावरून मला लगेच याबाबत त्वरित खुलासा करा' अशी पक्षाकडून नोटीस आलीय!!

## आजची दुर्गा

### वेदनेतील करुणा



डॉ. सरिता विनायक कडू

पान ८

# नव्या पिढीतील दिग्दर्शिकेच्या कलासंवेदनांचा प्रवास

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** हिंदी चित्रपटसृष्टीत पटकथा लेखिका, दिग्दर्शिका, निर्माती अशी स्वतःची बहुपेडी ओळख निर्माण करणाऱ्या प्रतिभासंपन्न दिग्दर्शिका झोया अख्तर यांच्याशी त्यांच्या कलाप्रवासाविषयी संवाद साधण्याचा योग जुळून आला आहे. 'लोकसत्ता गप्पा' या कार्यक्रमातून झोया अख्तर यांचा कलाप्रवास समजून घेण्याची संधी लाभणार आहे.

**हरतऱ्हेच्या घटनांच्या मंथनातून घडत जाणाऱ्या व्यक्तींची गोष्ट आपल्या चित्रपटांमधून सांगण्याचा प्रयत्न करणाऱ्या दिग्दर्शिका झोया अख्तर यांचा कलाप्रवास समजून घेण्याची संधी 'लोकसत्ता गप्पा' या कार्यक्रमातून लाभणार आहे.**

जात-धर्म-भाषा-स्तर सगळे भेदाभेद मोडू पाहणाऱ्याच्या काळजाला भिडणारे कथामाध्यम म्हणजे चित्रपट. आपल्या भवतालातील अनेक कौटुंबिक-सामाजिक घटना आणि त्या हरतऱ्हेच्या घटनांच्या मंथनातून घडत जाणाऱ्या व्यक्तींची गोष्ट सांगण्याचा प्रयत्न दिग्दर्शिका झोया अख्तर यांनी आपल्या चित्रपटांमधून केला. 'लोकसत्ता गप्पा' या कार्यक्रमातून त्यांच्या सर्जनशीलतेचा प्रवास उलगडण्यात येणार आहे. मराठी-



हिंदी चित्रपट आणि रंगभूमीवरून तितकेच वैविध्यपूर्ण काम करणारी सुप्रसिद्ध अभिनेत्री अमृता सुभाष 'लोकसत्ता गप्पां'च्या मंचावर झोया अख्तर यांना वेगवेगळ्या विषयांवर बोलते करणार आहे.

एम.के.घारे ज्वेलर्स प्रस्तुत लोकसत्ता गप्पा सहप्रायोजक ओएनजीसी KESARI

झोया अख्तर यांनी २००७ मध्ये 'हनीमून ट्रॅव्हल्स प्रा. लिमिटेड' या चित्रपटाची निर्मिती करत कारकिर्दीची सुरुवात केली. न्यूयॉर्क विद्यापीठातून चित्रपटनिर्मितीचे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर २००९ मध्ये झोया अख्तर यांनी 'लक बाय चान्स' या चित्रपटाद्वारे दिग्दर्शन क्षेत्रात पदार्पण केले. प्रसिद्ध गीतकार जावेद अख्तर आणि अभिनेत्री-लेखिका हनी इराणी यांच्या पोटी जन्मलेल्या झोया अख्तर यांना लेखनाचा वारसा घरातूनच मिळाला आणि चित्रपटाचे बाळकडूही लहानपणापासूनच त्यांना मिळाले. चित्रपट माध्यमाशी झालेली ही तोंडओळख पुढे प्रत्यक्ष कामातून वाढवत नेत स्वतंत्रपणे दिग्दर्शिका म्हणून सुरुवात करण्याइतकी घट्ट होत गेली. झोया अख्तर यांच्या कलासंवेदना, अनुभवाची शिदोरी असे बरेच काही या गप्पांमधून उलगडणार आहे.

▸ मुख्य प्रायोजक - एम. के. घारे ज्वेलर्स
▸ सहप्रायोजक - ऑइल अँण्ड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन लिमिटेड; केसरी टूर्स

# आयडीबीआय सरकारमुक्त

## ५२,८७८ कोटींत परदेशी 'फेअरफॅक्स'कडे; देशातील सर्वात मोठा निर्गुंतवणूक व्यवहार



पीटीआय, नवी दिल्ली

**आयडीबीआय बँकेतील** केंद्र सरकार आणि भारतीय आयुर्विमा महामंडळ अर्थात एलआयसीचा एकत्रित मिळून ६०.७२ टक्के हिस्सा कॅनडास्थित फेअरफॅक्स फायनान्शियल होल्डिंग्जला विकण्याच्या प्रस्तावावर केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी मंजुरीची मोहोर उमटवली. या व्यवहाराचे मूल्य ५२,८७८ कोटी रुपये असून, देशातील वित्तीय क्षेत्रातील आतापर्यंतची ही सर्वात मोठी थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) ठरण्याची शक्यता आहे.

सार्वजनिक मालकीच्या 'एअर इंडिया'नंतरचा हा सर्वात मोठा निर्गुंतवणूक व्यवहार ठरणार आहे. या व्यवहारामुळे सरकारी मालकीच्या बँकांच्या खासगीकरणाचा एक नवीन अध्याय सुरू होण्याची शक्यता आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक व्यवहारविषयक मंत्रिमंडळ समितीने या प्रस्तावाला मंजुरी दिली. गेल्या पाच वर्षांहून अधिक काळ लांबलेल्या या प्रक्रियेतील हा महत्त्वाचा टप्पा आहे. सरकारी मालकीच्या कंपन्यांमधील हिस्सा कमी करून खासगी भांडवलाला वित्तीय क्षेत्रात प्रवेश देण्याच्या केंद्र सरकारच्या प्रयत्नांना या निर्णयामुळे गती मिळण्याची अपेक्षा आहे.

### केंद्र सरकार-एलआयसीकडे ३४ टक्के हिस्सा

- या धोरणात्मक विक्रीनंतर आयडीबीआय बँकेत केंद्र सरकार आणि एलआयसी यांची मिळून ३४ टक्के भागीदारी कायम राहील, असे केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले.
- हा संपूर्ण व्यवहार चालू आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी पूर्णत्वाला जाण्याची अपेक्षा गुंतवणूक आणि सार्वजनिक मालमत्ता व्यवस्थापन विभागाचे (दीपम) सचिव अरुणीश चावला यांनी व्यक्त केली.
- व्यवहार पूर्ण करण्यापूर्वी आवश्यक नियामक मंजुरींची प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. त्यानंतर आयडीबीआय बँकेचे नियंत्रण 'फेअरफॅक्स'कडे हस्तांतरित होईल.
- तसेच, किरकोळ भागधारकांपुढे फेअरफॅक्सला समभागांच्या खरेदी प्रस्ताव (ओपन ऑफर) खुला करावा लागेल.

### 'सीएसबी'तील हिस्सेदारीबाबत निर्णय आवश्यक

फेअरफॅक्सची भारतात कॅथॉलिक सिरियन अर्थात सीएसबी बँकेतही हिस्सेदारी आहे. त्यामुळे आयडीबीआय बँकेतील व्यवहारानंतर पुढील दोन वर्षांच्या आत फेअरफॅक्सला एक तर सीएसबी बँकेचे आयडीबीआयमध्ये विलीनीकरण अथवा सीएसबी बँकेतील हिस्सेदारी विकून बाहेर पडावे लागेल.

केंद्र सरकारच्या तिजोरीत ८८ हजार कोटी / अर्थसत्ता

(छायाचित्र- यतीश भानू)



नाशिक येथील रामकुंड परिसरातील गोदावरीचे कोरडे पात्र.

# कुंभ ध्वजारोहणासाठी कोरड्या गोदावरीत पाणी

## दुष्काळ असतानाही नदी प्रवाही ठेवण्याकरिता निर्णय

अनिकेत साठे, लोकसत्ता

**नाशिक :** नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ध्वजारोहण सोहळ्याप्रसंगी गोदावरी प्रवाही ठेवण्याकरिता दुष्काळाच्या छायेत गंगापूर धरणातून पाणी सोडण्याची वेळ येणार आहे. कुंभच्या कामांमुळे सध्या शहरातील गोदापात्र शुष्क आहे. ध्वजारोहण सोहळ्यात गोदावरीचे सौंदर्य खुलविण्यासाठी ती प्रवाही ठेवण्याची तयारी प्रशासनाने केली आहे.

नाशिक येथील रामकुंड आणि त्र्यंबकेश्वरमध्ये कुशावर्त तीर्थ या दोन्ही ठिकाणी ३१ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजून दोन मिनिटांनी ध्वजारोहण होणार आहे. कुंभमेळ्यानिमित्त हाती घेतलेल्या कामांसाठी शहरातील रामकुंड व अन्य कुंड कोरडे ठेवण्यात आले आहेत. गोदापात्रात पाणी नसल्याने धार्मिक विधीसाठी देशभरातून येणारे भाविक नाराज होत आहेत. कुंभपर्वाची सुरुवात महाध्वज प्राणप्रतिष्ठा आणि ध्वजारोहणाने होणार असताना त्याप्रसंगी गोदावरी प्रवाही करण्याचा विचार कुंभमेळा प्राधिकरणाने केला आहे. या सोहळ्यास राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, केंद्रीय नेते व मंत्री तसेच १३ आखाड्यांच्या प्रमुख महंतांची उपस्थिती असणार आहे.

रामकुंड आणि अन्य कुंड भरण्यासाठी गंगापूर धरणातून पाणी सोडावे लागेल. श्री गंगा गोदावरी पंचकोठी पुरोहित संघासह साधू-महंतांनी ध्वजारोहणाच्या दिवशी गोदावरी प्रवाही ठेवण्याची मागणी केली आहे. गोदापात्रात कायमस्वरूपी पाणी राहावे, यासाठी काही पर्याय यापूर्वीच पुरोहित संघाने प्रशासनाला सुचवले होते, असे माजी अध्यक्ष सतीश शुक्ल यांनी सांगितले.

**जिल्ह्यातील पाणी स्थिती**

नाशिक जिल्ह्यातील १५ पैकी १३ तालुक्यांत दुष्काळ जाहीर झाला आहे. लहान-मोठ्या २६ धरणांमध्ये सध्या ६७,५७७ दशलक्ष घनफूट म्हणजे ९५ टक्के जलसाठा आहे. या स्थितीत गंगापूर धरणातून पाण्याचा विसर्ग करावा लागेल का, याविषयी प्रशासनाकडून अद्याप कुठलाही पत्रव्यवहार व सूचना आलेली नाही, असे नाशिक पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सोनल शहाणे यांनी सांगितले.

> पाटबंधारे विभागाशी समन्वय साधून सध्या काय परिस्थिती आहे, याची माहिती घेतली जात आहे. याची स्पष्टता झाल्यानंतर या संदर्भात माहिती दिली जाईल.
> – शेखर सिंह, आयुक्त, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण

### दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची मदत

**मुंबई :** दुष्काळग्रस्त भागांतील शेतकऱ्यांना दिवाळीचा दिलासा म्हणून पाच हजार रुपयांची मदत राज्य सरकारने जाहीर केली आहे. दिवाळीपूर्वी ही मदत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार असून एक कोटी शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे. गंभीर परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा म्हणून दिवाळीपूर्वी तातडीने पाच हजार रुपये त्यांच्या खात्यात जमा करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

### दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या ३०४वर

राज्यातील आणखी ४० तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आल्याने एकूण दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या ३०४ वर पोहोचली आहे. या तालुक्यांत दुष्काळी उपाययोजना जाहीर करण्याबरोबरच कर्जवसुलीवर बंदी आणि इतर सवलतीही जाहीर केल्या आहेत. त्यात जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, कृषी पंपांच्या चालू वीजबिलात सूट, विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी, रोजगार हमी योजनेंतर्गत अधिकाधिक कामांसाठी निकषांत शिथिलता, टँकरद्वारे पाणीपुरवठा यांचा समावेश आहे.

### उल्हासनगर रेल्वे स्थानक परिसरात एकाची हत्या

**उल्हासनगर :** उल्हासनगर शहरात गुन्हेगारी आणि गोळीबाराच्या घटनांचे सत्र थांबलेले नाही. बुधवारी रात्री कॅम्प क्रमांक ४ मधील उल्हासनगर रेल्वे स्थानकाबाहेर दोन हल्लेखोरांनी हरेश ऊर्फ शांती गजवानी यांची गोळ्या झाडून हत्या केली. पूर्ववैमनस्यातून हा हल्ला केला असावा, असा प्राथमिक अंदाज आहे. पान ३

### 'नेचर मॉर्ट'चे संस्थापक पीटर नेगी यांचे निधन

**नवी दिल्ली :** चित्र, शिल्प व छायाचित्र अशा विविध प्रदर्शनांसाठी भारतीय कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणाऱ्या नवी दिल्लीतील प्रसिद्ध नेचर मॉर्ट कलादालनाचे संस्थापक आणि अमेरिकन कलाकार पीटर नेगी यांचे दीर्घ आजारानंतर निधन झाले. पान ६

### पुण्यात आणखी एक वैद्यकीय महाविद्यालय

**पुणे :** पुण्यात 'कर्मचारी राज्य विमा निगम (ईएसआयसी) वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालया'साठी ५० 'एमबीबीएस' जागांना केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयाने मंजुरी दिली आहे. शैक्षणिक वर्ष २०२७-२८ पासून या महाविद्यालयात प्रवेश प्रक्रिया सुरू होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाजमाध्यमांवर दिली. पान ६

# सीजेपीची उद्या 'तिरंगा सभा'

## दास, रांका तिहार तुरुंगाच्या कोठडीत; विरोधी पक्षांचा संताप; आंदोलन तीव्र

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नवी दिल्ली :** जंतर-मंतरवर जाताना खासगी जागेत बेकायदा प्रवेश केल्याप्रकरणी दिल्ली पोलिसांनी कॉक्रोच जनता पार्टी ('सीजेपी') चे नेते सौरव दास आणि आशुतोष रांका यांना बुधवारी अटक केली. न्यायालयाने त्यांची पाच दिवसांच्या कोठडीसाठी तिहार तुरुंगात रवानगी केली आहे.

या घटनेनंतर दिल्लीतील वातावरण पुन्हा ढवळून निघाले असून विरोधी पक्षांच्या नेत्यांनी 'जंतर-मंतर' ताब्यात घेण्याचा इशारा दिला. 'सीजेपी'चे संस्थापक अभिजीत दिपके यांनी ही 'अघोषित आणीबाणी' असल्याची टीका करताना येत्या शुक्रवारी सायंकाळी दिल्लीत 'तिरंगा सभे'साठी जमण्याचे आवाहन केले आहे.

'एसआयआर'विरोधी आंदोलनाचे केंद्र ठरलेल्या जंतर-मंतरला आंदोलन स्थळांच्या यादीतून वगळण्याचे दिल्ली पोलिसांनी जाहीर केले आहे. मात्र, 'सीजेपी'च्या पदाधिकाऱ्यांनी मंगळवारी बॅरिकेड ओलांडून जंतर-मंतरवर प्रवेश केला. त्यावेळी आशुतोष रांका, सौरव दास, अजिंक्य शिंदे यांच्यासह ११ जणांना ताब्यात घेण्यात आले होते. त्यापैकी रांका आणि दास यांनी आधीच्या बंधपत्रातील शर्तींचा भंग केल्याप्रकरणी त्यांना प्रतिबंधात्मक अटक करण्यात आली तर, अजिंक्य शिंदे यांच्याकडून सहा महिने शांतता भंग न करण्याची हमी घेऊन जामिनावर त्यांची सुटका करण्यात आली. विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी रांका आणि दास यांना पाच दिवसांच्या कोठडीसाठी तिहार कारागृहात पाठवण्याचे आदेश दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

'सीजेपी'चे संस्थापक अभिजीत दिपके यांनी या कारवाईची तुलना ब्रिटिश राजवटीतील स्वातंत्र्यसैनिकांच्या अटकेशी केली. 'या देशात तिरंगा फडकवणे हा गुन्हा आहे का? ब्रिटिशांच्या काळात सार्वजनिक (पान ६ वर)



> राष्ट्रध्वज फडकवणे हाच जणू देशातील सर्वांत मोठा गुन्हा ठरला आहे. आणीबाणीच्या काळातही असे घडले नव्हते. त्यामुळे देशात आणीबाणी लादायची असेल, तर ती अधिकृतपणे लादा.
> – अभिजीत दिपके, 'सीजेपी'चे संस्थापक

### भारतीय कंपन्यांकडून सौदी विमानसेवा रद्द

**मुंबई :** हुथी बंडखोरांच्या हवाई हल्ल्यांमुळे इंडिगो, एअर इंडिया, एअर इंडिया एक्स्प्रेस आणि आकासा एअर या प्रमुख भारतीय विमान कंपन्यांनी सौदी अरेबियाला जाणारी आणि तिथून येणारी सर्व उड्डाणे १७ ऑक्टोबरपर्यंत रद्द केली आहेत. हुथी बंडखोरांनी रियाधच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर केलेल्या क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ल्यांनंतर प्रवाशांसह कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा उपाय म्हणून हा तातडीचा निर्णय घेण्यात आला.

येमेनमधील हुथी बंडखोरांनी सौदी अरेबियावर क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले केले आहेत. रियाधच्या मुख्य विमानतळावर आणि दम्माम शहराजवळ झालेल्या हल्ल्यांनंतर सौदी सरकारने हवाई क्षेत्र सुरक्षित ठेवण्यासाठी रियाध विमानतळ १७ ऑक्टोबरच्या मध्यरात्रीपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. भारतातील सर्वात मोठ्या विमान कंपन्यांपैकी एक असलेल्या इंडिगोने (पान ७ वर)

# '...कारण आमचे निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार नाहीत!'

**काँग्रेसचे माजी आमदार अनंत गाडगीळ यांनी अमेरिकेतून नोंदवलेली निवडणूक निरीक्षणे**

**इराण युद्धाचे परिणाम, इंधन दरांचा भडका, आरोग्य विषयक खर्चातील वाढ, ट्रम्प सरकारचा एकूण कारभार आणि 'इमिग्रेशन' (स्थलांतर) या मुद्द्यांभोवती मध्यावधी निवडणूक फिरू लागली आहे.**






अमेरिकेमध्ये 'काँग्रेस'च्या दोन्ही सभागृहांच्या ('हाउस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज' आणि 'सिनेट') सार्वत्रिक निवडणुकांची धामधूम सध्या सुरू आहे. विविध संस्था आणि माध्यमांनी केलेल्या सर्वेक्षणांतून या निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाविरोधात मोठे वातावरण असल्याचे दिसते. डेमोक्रॅटिक पक्षाचे नेते राजकीय सुनामीचे भाकीत वर्तवत आहेत. मात्र, सर्वेक्षणांचे निष्कर्ष चुकूही शकतात. असे असताना तुम्हाला एवढा आत्मविश्वास कसा, असा प्रश्न एका डेमोक्रॅट नेत्याला विचारला असता, तो उत्तरला : कारण आमचे निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार नाहीत!

अमेरिकेतील रिवाजानुसार या निवडणुका विद्यमान अध्यक्षांच्या कारकिर्दीच्या मध्यावर, नोव्हेंबर महिन्यातील पहिल्या मंगळवारी होत असतात. त्यानुसार त्या येत्या ३ नोव्हेंबर रोजी होत आहेत. २०२४च्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प यांनी 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' (मागा) ही आकर्षक घोषणा दिली होती. त्या पार्श्वभूमीवर या निवडणुकीचे विश्लेषण आपण कसे कराल, असे एका अमेरिकी राजकीय विश्लेषकास विचारले असता, क्षणातच त्याने, 'मागा' म्हणजेच तुमच्याकडचे 'अच्छे दिन', असे मार्मिक उत्तर दिले.

इराण युद्धाचे अमेरिकी अर्थव्यवस्थेवरील परिणाम, त्यामुळे झालेली पेट्रोलदरातील वाढ, वाढलेली महागाई, आरोग्यविषयक खर्चातील वाढ, ट्रम्प (पान ९ वर)

# रक्तदात्यांना महागडी घड्याळे; तीन रक्तपेढ्यांवर बडगा

## परवाना निलंबित, 'एफडीए'कडून कारवाई

लोकसत्ता प्रतिनिधी



**रक्तदात्यांना महागडी घड्याळे भेट देण्यासंबंधीचे वृत्त १० एप्रिल रोजी 'लोकसत्ता'मध्ये प्रसिद्ध करण्यात आले होते.**

**मुंबई :** ग्रँट रोड येथे आयोजित रक्तदान शिबिरामध्ये रक्तदात्यांना 'टायटन'ची महागडी घड्याळे भेट म्हणून दिल्याप्रकरणी अन्न व औषध विभागाने (एफडीए) तीन रक्तपेढ्यांवर कारवाईचा बडगा उगारला. इंडियन रेड क्रॉस सोसायटी रक्तपेढी, जे.जे. रुग्णालय रक्तपेढी, नायर रुग्णालय रक्तपेढी यांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत.

रिलायन्स समूहाचे अनंत अंबानी यांच्या वाढदिवसानिमित्त ९ एप्रिल रोजी 'यंगस्टार मित्र मंडळा'तर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या जाहिरातीमध्ये रक्तदात्यांना टायटन कंपनीचे घड्याळ भेट देण्यात येणार असल्याचे नमूद केले (पान २ वर)

# रक्तातील साखरेचा मानसिक आरोग्यावर परिणाम

आरोग्य वार्ता

**नवी दिल्ली :** मधुमेहाने ग्रस्त बहुतांश जण रक्तातील साखर नियंत्रित करणे, औषधे घेणे आणि आहारविषयक सल्ल्याचे पालन करतात. काहींना साखरेच्या अनिश्चिततेचे व्यवस्थापन करणे, दररोज आरोग्याविषयी निर्णय घेताना भविष्याची चिंता सतावत असते. एकूणच रक्तातील साखरेची अनियंत्रित पातळी मानसिक आरोग्यावर परिणाम करू शकते. अशा परिस्थितीवर तणावाच्या योग्य व्यवस्थापनाद्वारेच मात करता येऊ शकते, असे तज्ज्ञांनी सांगितले.

काही लोकांना प्रयत्न करूनही त्यांची रक्तातील साखरेची पातळी लक्ष्यापेक्षा जास्त राहिल्याने निराशा वाटते. तर काहींना आवडीचे काही तरी खाल्ल्याने किंवा नियोजित चालणे चुकल्याने अपराधीपणा वाटतो. अनपेक्षितपणे वाढलेली रक्तातील साखर चिंता निर्माण करू शकते, तर अचानक घट झाल्याने विशेषतः रात्री किंवा प्रवासादरम्यान भीतीही वाटू शकते. कालांतराने, चढ-उतार होणारी साखरेची पातळी आणि दीर्घकालीन गुंतागुंतींबद्दलची चिंता, झोप, नातेसंबंध आणि जीवनाच्या गुणवत्तेवर परिणाम करू शकते. अशा परिस्थितीत तणावाचे योग्य व्यवस्थापन करण्याचा सल्ला आरोग्य तज्ज्ञांनी दिला आहे.

साखरेच्या पातळीतील चढ-उतार समजून घेणे, नियमित हळुवार श्वास घेणे, विश्रांतीचे व्यायाम करणे हे चिंता कमी करण्यास मदत करू शकते. जेव्हा मधुमेहाचे व्यवस्थापन कठीण होते तेव्हा कुटुंबातील सदस्य आणि आरोग्य तज्ज्ञांशी मोकळेपणाने बोला. रक्तातील साखरेची पातळी वारंवार कमी होत असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन तज्ज्ञांनी केले आहे.

बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
एक परिवार एक बँक

गोल्ड लोन
@8.75%* p.a.
मिस कॉल द्या
8010614614

Dr. Rucha's Tanvi CLINIC
डॉ. रुचाज् तन्वी हर्बल्स क्लिनिक आणि नवतेज पंचकर्म सेंटर

ACIDITY महाकॅम्प
FREE हेल्थ चेकअप
तज्ज्ञ डॉक्टरांकडून योग्य मार्गदर्शन.
तज्ज्ञ डॉक्टरांकडून योग्य मार्गदर्शन.
तन्वी संचालिका
डॉ. रुचा मेहेंदळे - पै
By appointment only
आजच नाव नोंदवा : ठाणे 9082911530

# 'खलित्यांच्या लढाई'बाबत 'मसाप'चे अध्यक्ष अनभिज्ञ

## कोणतेही वाद नसल्याचा कोषाध्यक्षांचा दावा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यकारिणीमध्ये कोणत्याही स्वरूपाचे वाद नाहीत. जे गैरसमज आहेत, ते एका बैठकीद्वारे लवकरच दूर होतील. **– प्रदीप निफाडकर,** कोषाध्यक्ष आणि प्रवक्ते, 'मसाप'

**पुणे :** महाराष्ट्र साहित्य परिषदेतील (मसाप) 'खलित्यां'च्या लढाईबद्दल पुरेशी कल्पना नसल्याचे सांगून महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी याबाबत अधिक भाष्य टाळले. 'संबंधित पदाधिकारी मार्ग काढतील,' असा विश्वास व्यक्त करतानाच, 'तांत्रिक चुका मान्य करून दुरुस्ती करण्याचा मोकळेपणा माझ्याकडे आहे,' असेही स्पष्ट केले.

घटनेनुसार कामकाजाचा आग्रह धरणाऱ्या मसापच्या कार्यवाहाला, 'तुमच्यावरच कारवाई का करण्यात येऊ नये,' असे नोटीसवजा पत्र प्रमुख कार्यवाहांनी दिल्यानंतर कार्यकारिणीतील वादविवादांना तोंड फुटले. या पार्श्वभूमीवर, सोमण यांच्याशी संवाद साधला असता, ते म्हणाले, 'नांदी संमेलनांच्या नियोजनासाठी चंद्रपूर, नागपूर दौऱ्यावर होतो. प्रमुख कार्यवाह आणि स्थानिक कार्यवाह यांच्यातील वादासंदर्भात कोणतीही कल्पना नाही. हे पदाधिकारी सक्षम असून, तेच त्यातून मार्ग काढतील. मात्र, अनुभवामध्ये कमी पडल्याने हातून त्रुटी राहिल्या, तर त्या मान्य करण्याचा मोकळेपणा माझ्याकडे आहे.'

'मसाप'ची नवी कार्यकारिणी अस्तित्वात येऊन सहा महिन्यांचाच कालावधी उलटला, तोवर ही 'खलित्यां'ची लढाई सुरू झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. त्यातच अवघ्या शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अवघ्या १०० दिवसांवर येऊन ठेपले असताना हा 'पत्रापत्री'चा खेळ सुरू झाल्याने 'मसाप'मध्ये सारे काही आलबेल नसल्याचा संदेश बाहेर जात असल्याची खंत साहित्य वर्तुळात व्यक्त होत आहे.

तांत्रिक पूर्ततेच्या अभावी महाराष्ट्र साहित्य परिषदेची वार्षिक सभा पुढे ढकलल्यानंतर संस्थेतील वाद उफाळून आला. परिषदेचे काम घटनाबाह्य असल्याचा आरोप करणारे पत्र स्थानिक कार्यवाह सुनील महाजन यांनी प्रमुख कार्यवाह स्वाती महाळंक यांना दिले. त्यानंतर महाळंक यांनी, 'तुमच्यावर कारवाई का करण्यात येऊ नये,' असे पत्र महाजन यांना सोमवारी रात्री दिले. मात्र, हे पत्र कार्यवाहांना समाज माध्यमाद्वारे देण्यात आल्यानंतर वादाला तोंड फुटले.

'परिषदेच्या प्रमुख कार्यवाह यांनी पाठविलेले पत्र मला मिळाले. त्या संदर्भात कायदेशीर सल्ला घेऊन पुढील कार्यवाही करणार आहे,' असे सुनील महाजन यांनी स्पष्ट केले. 'संस्थेच्या कामकाजातील त्रुटी निदर्शनास आणून देणे हे कार्यकारिणी सदस्य म्हणून आपले कर्तव्य आहे. संवादाचे मार्ग बंद होत असतील, तर जाहीरपणे भूमिका मांडणे लोकशाहीत अपेक्षित आहे,' याकडे त्यांनी लक्ष वेधले.

# राज्यातील शालेय शिक्षकांच्या उपस्थितीची ऑनलाइन नोंद

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**पुणे :** राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या, माध्यमांच्या शाळांतील पहिली ते बारावीच्या शिक्षकांच्या उपस्थितीची १५ ऑक्टोबरपासून ऑनलाइन नोंद करावी लागणार आहे. 'स्विफ्ट चॅट' या ॲप्लिकेशनवर ही नोंद केली जाणार असून, दोन सत्रांत भरणाऱ्या शाळांसाठी सकाळी सात ते बारा, तर अन्य शाळांसाठी सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळेत आणि रात्रशाळांना रात्री नऊ वाजेपर्यंत नोंदवता येणार आहे.

शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी या बाबतच्या सूचना परिपत्रकाद्वारे दिल्या आहेत. राष्ट्रीय विद्या समीक्षा केंद्राद्वारे विद्यार्थी आणि शिक्षकांची उपस्थिती यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून 'रिअल टाइम' पद्धतीने संनियंत्रित केली जाणार आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांची ऑनलाइन उपस्थिती या पूर्वीच सुरू करण्यात आली आहे. आता शिक्षकांचीही ऑनलाइन उपस्थिती नोंदवण्याचे निर्देश आहेत. त्यानुसार १५ ऑक्टोबरपासून या नोंदी करण्याबाबतच्या सूचना मुख्याध्यापकांना देण्यात आल्या आहेत. त्यांच्या अनुपस्थितीत प्रभारी मुख्याध्यापकांनी नोंदवणे अनिवार्य असेल. शालार्थ संकेतस्थळावर असलेल्या शाळांतील मुख्याध्यापकांनी स्विफ्ट चॅट ॲप्लिकेशनवर उपस्थिती नोंदवताना शाळेचा यूडायस क्रमांक, स्वतःच्या शालार्थ क्रमांकाचा वापर करावा. शालार्थ संकेतस्थळावर नोंदवलेला मोबाइल क्रमांक वापरावा, मोबाइल क्रमांक बदलल्यास तो शालार्थ संकेतस्थळावर अद्ययात करावा. शालार्थ संकेतस्थळावर नसलेल्या शाळांच्या मुख्याध्यापकांनी यूडायस प्लसमधील १० अंकी नॅशनल टीचर कोड, यूडायस संकेतस्थळावर नोंदवलेल्या मोबाइल क्रमांकाचा वापर करावा. ऑनलाइन उपस्थिती नोंदवण्यास अडचणी आल्यास त्या https:// tinyurl. com/ AttendanceBot या दुव्यावर नोंदवण्यात येतील.

# स्वायत्त संस्थांत शुल्क तपासणी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** स्वायत्त महाविद्यालयांतील अभ्यासक्रमांच्या शुल्काची तपासणी उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून करण्यात येणार आहे. महाविद्यालयांतील स्वयंअर्थसहाय्यित व्यावसायिक स्वरूपाचे अभ्यासक्रम या तपासणी मोहिमेच्या केंद्रस्थानी राहणार असून, त्यानंतर शुल्क तपासणीबाबत पुढील धोरणात्मक निर्णय घेतला जाणार आहे.

उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी ही माहिती दिली. राज्यात १५१ स्वायत्त महाविद्यालये असून त्यांना नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, परीक्षा पद्धती ठरवणे अशा स्वरुपाचे स्वातंत्र्य असते. त्यानुसार महाविद्यालयांनी या कला, वाणिज्य, विज्ञान या शाखांअंतर्गत पदवी, पदव्युत्तर स्तरावर नवनवे अभ्यासक्रम सुरू केले आहे. त्यात सायबर सुरक्षा, विदा विज्ञान, फॅशन, ॲनिमेशन, ब्लॉकचेन अशा नावीन्यपूर्ण अभ्यासक्रमांचाही समावेश आहे. त्यासाठी ३०-४० हजारांपासून ६०-७० हजार रुपयांपर्यंत शुल्क आकारले जाते. मात्र, या नव्या अभ्यासक्रमांच्या शुल्कनिश्चितीबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

# अनुदानित वसतिगृहांतील कर्मचाऱ्यांना दुप्पट मानधन

**मुंबई :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांकडून चालविण्यात येणाऱ्या अनुदानित वसतिगृहांतील कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यानुसार अधीक्षक, स्वयंपाकी, मदतनीस आणि चौकीदार यांच्या मानधनात वाढ करण्यात आली आहे.

राज्यात अशी एकूण २,३८८ अनुदानित वसतिगृहे आहेत. या वसतिगृहांची मंजूर विद्यार्थी क्षमता ९९,८५२ आहे. या वसतिगृहांतील कर्मचाऱ्यांचे मानधन अत्यल्प असल्याने त्यात वाढ करण्याची मागणी लोकप्रतिनिधी, कर्मचारी संघटना आणि विविध संस्थांकडून सातत्याने करण्यात येत होती. यासाठी आंदोलने आणि उपोषणेही झाली होती.

# औषधनिर्माणशास्त्र प्रवेशाची तिसरी यादी जाहीर

**मुंबई :** औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या तिसऱ्या प्रवेश फेरीसाठीची यादी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने जाहीर केली आहे. त्यानुसार बी. फार्मसी व सहा वर्षांचा फार्म.डी. अभ्यासक्रमासाठी ६ हजार ७२० विद्यार्थ्यांना तसेच दोन वर्षांचा एम. फार्मसी व तीन वर्षांचा पदव्युत्तर फार्म.डी. अभ्यासक्रमासाठी १ हजार २३८ विद्यार्थ्यांना संधी मिळाली.

दरम्यान, राज्यातील ५२८ फार्मसी महाविद्यालयांतील ४७ हजार १९२ जागांपैकी पहिल्या यादीत १६ हजार ७३४, तर दुसऱ्या यादीत ७ हजार ४३२ याप्रमाणे एकूण २४ हजार १६६ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केले आहेत. त्यानंतर ८ हजार ७२० पेकी ६ हजार ७२० विद्यार्थ्यांना तिसऱ्या यादीत प्रवेशाची संधी उपलब्ध झाली आहे.

# '...कारण आमचे निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार नाहीत!'

**(पान १ वरून)** सरकारचा एकूण कारभार आणि 'इमिग्रेशन' (स्थलांतर) या काही मुद्द्यांभोवती ही निवडणूक फिरू लागली आहे. इराण युद्धामुळे अमेरिकी नागरिकांना सगळ्यात मोठा फटका बसला आहे तो पेट्रोल दरवाढीचा. गेल्या वर्षी दिवाळीच्या सुमारास अमेरिकेत नियमित दर्जाचे पेट्रोल लिटरला सुमारे ७३ रुपये (गॅलनला ३.५ डॉलर) होते. आज ते लिटरला जवळपास ९५ रुपयांपर्यंत गेले आहे. अनुषंगाने, खाद्य व ऊर्जा क्षेत्रातील किमती अडीच टक्क्यांनी महागल्या आहेत. घरगुती विजेचे बिल सरासरी तीन ते पाच टक्क्यांनी, तर औद्योगिक वीजबिल सात ते दहा टक्क्यांपर्यंत वाढले आहे. घरभाडी सरासरी तीन टक्क्यांनी वाढली आहेत. महागाई निर्देशांक वर्षभरात साडेतीन टक्क्यांनी वाढला आहे. रुग्णालयसेवेचा खर्च गेल्या महिन्याभरात एक टक्क्याने, तर वर्षभरात पाच टक्क्यांनी वाढला आहे. यास अपवाद औषधांच्या किमतींचा. त्या दोन टक्क्यांनी कमी झाल्या आहेत. नोकरदार वर्गाच्या पगारात मात्र जेमतेम तीन टक्के वाढ झाली आहे. थोडक्यात, एकीकडे कमी पगारवाढ आणि दुसरीकडे महागाई, अशा कात्रीत अमेरिकी जनता सापडली आहे.

याचबरोबर या निवडणुकीत एक अनपेक्षित आणि धक्कादायक मुद्दा जोर धरताना दिसत आहे. हा मुद्दा आहे 'डेटा सेंटर्स' म्हणजेच विदा केंद्रांचा. आज कृत्रिम प्रज्ञेच्या (एआय) विश्वात 'चॅट-जीपीटी', 'जेमिनी', 'क्लॉड' यांसारख्या अनेक 'चॅटबॉट्स'चा वापर वाढत चालला आहे. अशा बाबींमुळे अमेरिकेमध्ये विविध ठिकाणी विदा केंद्रे उभारावी लागणार आहेत. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर जमिनींबरोबरच अतिरिक्त ऊर्जा आणि भरमसाठ पाणी यांची आवश्यकता भासणार आहे. ही केंद्रे उभारण्यासाठी प्रचंड खर्च अपेक्षित आहे. युद्धामुळे ताणल्या गेलेल्या अर्थव्यवस्थेत भविष्यात हे कसे झेपणार, हा प्रश्न या क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित करीत आहेत.

अमेरिकेत सध्या दर आठवड्याला विविध संस्था, दूरचित्रवाणी वाहिन्या आणि वर्तमानपत्रांद्वारे सर्वेक्षणांचे अंदाज प्रसिद्ध केले जात आहेत. या सर्वेक्षणांच्या निष्कर्षांचा आणि आकडेवारीचा रिपब्लिकन उमेदवारांनी मोठा धसका घेतल्याचे दिसते. कोणतीही जोखीम पत्करायला नको म्हणून त्यांनी डॉलरच्या राशी ओतण्यास सुरुवात केल्याचे दिसते. त्यांच्या खर्चाची आकडेवारी भारतातील काही छोट्या राज्यांच्या अंदाजपत्रकापेक्षाही कितीतरी पटींनी जास्त आहे.

उत्तर कॅरोलायना राज्यात डेमोक्रॅट पक्षाची उमेदवारी दोन वेळा राज्यपाल (गव्हर्नर) राहिलेल्या रॉय कूपर यांना मिळताच, रिपब्लिकन पक्षाने तेथे दूरचित्रवाणीवर अंदाजे २९० कोटी रुपयांच्या जाहिराती प्रसारित केल्या आहेत. राष्ट्रीय पातळीवर, डेमोक्रॅट पक्ष उमेदवारांवर सरासरी ४८० कोटी रुपये खर्च करीत असल्याचा अंदाज आहे. याउलट, रिपब्लिकन पक्षाचा खर्च तीन हजार कोटी रुपयांच्या घरात जाण्याची शक्यता आहे.

अमेरिकेचे भौगोलिक केंद्र म्हणून ओळखले जाणारे कॅन्सस राज्य व 'वेस्टर्न'पटांमुळे प्रसिद्धीस पावलेले टेक्सास राज्य येथे प्रस्तुत लेखकाचे यापूर्वी वास्तव्य होते. ही दोन्ही राज्ये म्हणजे रिपब्लिकन पक्षाचे बालेकिल्ले. विठ्ठलराव गाडगीळ नेहमी म्हणत, की पुण्यातील शनिवार, नारायण, सदाशिव या पेठांतून काँग्रेसने ब्रह्मदेवाला उभे केले, तरी तो निवडून येणार नाही. अशीच परिस्थिती कॅन्ससइटेक्सासची. १९३२ पासून येथे कधीही डेमोक्रॅट खासदार निवडून आलेला नाही. मात्र, अमेरिकी सरकारच्या तीन लाख टन गोमांस आयात करण्याच्या–तेही विना 'टॅरिफ'– निर्णयामुळे कॅन्सस, ओक्लाहोमा, नेब्रास्का यांसारख्या कृषिप्रधान राज्यांतील शेतकरीवर्गात मोठी नाराजी पसरली आहे. या बहुतांश राज्यांतून ट्रम्प यांनी गेल्या निवडणुकीत मुसंडी मारली होती. तेथे आता डेमोक्रॅट हळूहळू पुढे सरकत आहेत, असे सर्वेक्षणांत प्रकर्षाने दिसू लागले आहे.

**MUMBAI CRICKET ASSOCIATION**
Cricket Centre, Wankhede Stadium, D Road, Churchgate, Mumbai 400020

**TENDER NOTICE 2**

Sealed tenders are invited for the proposed LED Floodlighting system with DMX controls at MCA Sachin Tendulkar Gymkhana, Kandivali, Mumbai. Tender Documents can be obtained from the MCA Office against payment of ₹ 15,000/- which is non-refundable. Details available on www.mumbaicricket.com under tenders section.

Prof. Dr. Unmesh Khanvilkar, Secretary
Nilesh Bhosle, Jt. Secretary

**MUMBAI CRICKET ASSOCIATION**
Cricket Centre, Wankhede Stadium, D Road, Churchgate, Mumbai 400020

**TENDER NOTICE 1**

Sealed tenders are invited for the proposed LED Floodlighting system with DMX controls at MCA Sharad Pawar Indoor Cricket Academy and Recreation Centre, BKC, Mumbai. Tender Documents can be obtained from the MCA Office against payment of ₹ 15,000/- which is non-refundable. Details available on www.mumbaicricket.com under tenders section.

Prof. Dr. Unmesh Khanvilkar, Secretary
Nilesh Bhosle, Jt. Secretary

INDIAN EXPRESS GROUP



चित्र गप्पा

नव्या-नव्या गोष्टींची बेताबी, समृद्ध विचार-संस्कारांतून लाभलेली दृष्टी आणि 'गली बॉय' ते 'द आर्चिस'पर्यंत सेल्युलॉईडवर हरतऱ्हेचे कल्पविश्व रंगवण्याची हातोटी लाभलेल्या प्रतिभासंपन्न दिग्दर्शिका **झोया अख्तर** यांच्याशी गप्पा.

एम.के.घारे ज्वेलर्स
प्रस्तुत
लोकसत्ता गप्पा


संवादक :
**अमृता सुभाष,**
सुप्रसिद्ध अभिनेत्री

सहप्रायोजक
ओएनजीसी ONGC
KESARI World Class Travel Company

लोकसत्ता लोकमान्य लोकशक्ती
प्रवेश फक्त निमंत्रितांसाठी

EXPRESS Careers

**मुंबई पत्तन प्राधिकरण**

जाहिरात क्रमांक HR/CON.-08/2026,
दिनांक: 05.10.2026

खालील पदासाठी पूर्णपणे कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती करण्याकरिता पात्र भारतीय नागरिकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**1. मुख्य व्यवस्थापक (ICT) – 01 पद**

एकत्रित मानधन, शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा, अनुभव, अर्ज प्राप्त करण्याची अंतिम तारीख इत्यादींबाबतच्या सविस्तर माहितीसाठी आमच्या **www.mumbaiport.gov.in** या संकेतस्थळाला (People & Career / Jobs / Advertisements) भेट द्यावी. अर्जाचा विहित नमुना आमच्या संकेतस्थळावरून डाउनलोड करून त्याच नमुन्यात अर्ज सादर करावेत.

**व्यवस्थापक (मानव संसाधन)**

**JAGRUT MOTORS PVT LTD**
MARUTI SUZUKI INDIA LIMITED AUTHORISED DEALER
RATNAGIRI & SINDHUDURG
**WE'RE HIRING!**

- **GENERAL MANAGER (SALES) :** Minimum 2 To 3 Years Experience in Any Automobile Dealership.
- **SALES MANAGER :** 1 To 2 Years Of Experience in Any Automobile Dealership.
- **WORKSHOP MANAGER :** 3 to 4 Years Experience in any Automobile Workshop, Team Handling.
- **BODYSHOP MANAGER :** Minimum 2 To 3 Years Experience in Automobile Bodyshop.
- **SPARE PART MANAGER :** Minimum 2 to 3 Years Experience in Any Automobile Spare Parts / Sparepart Distributor, Team Handling And Strong Grasping Ability.

INTERESTED CANDIDATE CAN SEND BIO-DATA ON WHATSAPP – **7447476672**
Email - **jagrut.recruitment72@gmail.com**

TALE VIBHAG SHIKSHAN PRASARAK MANDAL'S
**D. G. TATKARE ARTS & COMMERCE COLLEGE, TALA**
Taluka - Tala, Dist - Raigad - 402 111. Maharashtra
Email : dgtcollegetala1@yahoo.co.in

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POST FROM THE ACADEMIC YEAR 2026-2027.**

**AIDED**

| Sr. No. | Cadre | Subject | No. of Posts | Post Reserved for |
|---|---|---|---|---|
| 01 | ASSISTANT PROFESSOR | Accountancy | 01 | 01 - OBC |
| 02 | ASSISTANT PROFESSOR | Business Economics | 01 | 01 - SC |

The posts for the reserved category candidates will be filled in by the same category candidates (Domicile of State of Maharashtra) belonging to that particular category only.
Reservation for women will be as per University Circular No. BCC/16/74/1998 dated 10th March, 1998. 4% reservation shall be for the persons with disability as per University Circular No. Special Cell/ICC/2019-20/05 dated 05th July, 2019.
Candidates having knowledge of Marathi will be preferred.
"Qualification, Pay Scales and other requirement are as prescribed by the UGC Notification dated 18th July, 2018, Government of Maharashtra Resolution No.Misc-2018/C.R.56/18/UNI-1, dated 8th March, 2019 and University circular No. TAAS/(CT)/ICD/2018-19/1241, dated 26th March, 2019 and revised from time to time" The Government Resolution & Circular are available on the website mu.ac.in
Applicants who are already employed must send their application through proper channel.
Applicants are required to account for breaks, if any in their academic career.
Candidates belonging to reserved categories should send two Xerox copies of their application along with the attested copy of the Caste Certificate to the Deputy Registrar, Special Cell, University of Mumbai, Mumbai - 400 032.
Applications with full details should reach to the **SECRETARY, Tale Vibhag Shikshan Prasarak Mandal's D. G. Tatkare Arts & Commerce College, Tala , At. Post - Tala, Taluka - Tala, Dist - Raigad - 402111. Within 15 days** from the date of publication of this advertisement. This is University approved advertisement.

Sd/-
SECRETARY